# अनुक्रमणिका

*अनुक्रमणिका* ........................................................................................................ 1

*१. कार्यकारी सारांश* ........................................................................................................ 2

१.१ ऐतिहासिक दृष्टीकोन: ........................................................................ 2

१.२ औष्णिक आणि जलविद्युत निर्मिती कंपन्यांची स्थापित क्षमता ........................ 2

१.३ प्रस्तुत याचिकेअंतर्गत सादरीकरणे: ........................................................ 4

१.४ द टाटा पॉवर कंपनी मर्यादित - निर्मिती उद्योगाची कार्यान्वयन कामगिरी: ...... 4

१.५ द टाटा पॉवर कंपनी मर्यादित - निर्मिती उद्योगाची आर्थिक कामगिरी .............. 9

१.६ इंधन किमती: ....................................................................................... 12

१.७ ऊर्जा शुल्क ........................................................................................ 14

१.८ प्रोत्साहने, अनियंत्रित खर्च आणि नफा आणि तोट्याचे वितरण: ........................ 15

१.९ आर्थिक वर्ष २०१९-२० ते आर्थिक वर्ष २०२२-२३ या कालावधीसाठी निव्वळ तफावत / (अतिरिक्त) ........................................................................................ 17

१.१० मागील वसुली ....................................................................................... 19

१.११ आर्थिक वर्ष २०२३-२४ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ या कालावधीसाठी एकूण निर्मिती सुधारित दर निश्चिती ........................................................................ 22

# १. कार्यकारी सारांश

## १.१ ऐतिहासिक दृष्टीकोन:

द टाटा पॉवर कंपनी मर्यादित ("द टाटा पॉवर") ही १९१९ मध्ये स्थापन झालेली कंपनी आहे. १ एप्रिल २००० रोजी द टाटा हायड्रो इलेक्ट्रिक पॉवर सप्लाय कंपनी लिमिटेड (१९१० मध्ये स्थापन झालेली) आणि आंध्र व्हॅली पॉवर सप्लाय कंपनी लिमिटेड (१९१६ मध्ये स्थापन झालेली) या दोन कंपन्यांचे द टाटा पॉवरमध्ये विलिनीकरण झाले आणि एक एकात्मिक कंपनी स्थापन झाली. या विलिनीकरणाचा परिणाम म्हणून उक्तनिर्देशित कंपन्यांचे परवानेही विलिनीकृत झाले आणि द टाटा पॉवरला महाराष्ट्र शासनाकडून (जीओएम) तिच्या मुंबई परवाना क्षेत्रात जनतेला वीजपुरवठा करण्यासाठी आणि वितरण परवानाधारकांना मोठ्या प्रमाणावर वीजपुरवठा करण्यासाठी ठराव क्र. आयईए- २००१/ सीआर- १०५०९/ एनआरजी-१ दिनांक १२ जुलै २००१ नुसार परवाना देण्यात आला.

## १.२ औष्णिक आणि जलविद्युत निर्मिती कंपन्यांची स्थापित क्षमता

द टाटा पॉवर कंपनी मर्यादित - निर्मिती उद्योगाची सध्याची निर्मिती क्षमता १३७७ मेगावॅट आहे. त्यात जलविद्युत निर्मितीची ४४७ मेगावॅट आणि औष्णिक विद्युत निर्मितीची ९३० मेगावॅट समाविष्ट आहे. द टाटा पॉवर कंपनी मर्यादित - निर्मिती उद्योगाची केंद्रनिहाय आणि युनिटनिहाय आकडेवारी खालील कोष्टकात दिल्याप्रमाणे आहेः

**तक्ता १-१: निर्मिती केंद्रांची स्थापित क्षमता**

| निर्मिती युनिट | इंधनाचा प्रकार | युनिटची स्थिती | क्षमता (मेगावॅट) |
|---|---|---|---|
| युनिट ५ | कोळसा, तेल व गॅस | कार्यान्वित | ५०० |
| युनिट ७ | गॅस | कार्यान्वित | १८० |
| युनिट ८ | कोळसा व तेल | कार्यान्वित | २५० |
| **एकूण औष्णिक क्षमता** | | | **९३०** |
| भिरा | | कार्यान्वित | ३०० |
| भिवपुरी | | कार्यान्वित | ७५ |
| खोपोली | | कार्यान्वित | ७२ |
| **एकूण जलविद्युत क्षमता** | | | **४४७** |
| **एकूण निर्मिती क्षमता** | | | **१३७७** |

संपूर्ण निर्मिती क्षमता ही मुंबईतील दोन वितरण कंपन्यांशी दीर्घकालीन तत्वावर बांधली गेलेली आहे:

(i) बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन (बेस्ट)

(ii) द टाटा पॉवर कंपनी लिमिटेड- वितरण उद्योग (टाटा पॉवर -डी)

वरीलपैकी प्रत्येक वितरण परवानाधारकांसोबत बांधण्यात आलेल्या चालू निर्मिती क्षमतांचा वाटा खालीलप्रमाणे आहेः

**तक्ता १-२: द टाटा पॉवर कंपनी मर्यादित - निर्मिती उद्योगाचे वितरण कंपन्यांसोबतचे वीज खरेदी करारनामे**

| निर्मिती युनिट | इंधनाचा प्रकार | निर्मिती क्षमता (मेगावॅट) | बेस्टसोबत भागीदारी | | टाटा पॉवर-डीसोबत | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | %वारी | मेगावॅट | %वारी | मेगावॅट |
| युनिट ५ | कोळसा, तेल व गॅस | ५०० | ५१.१७% | २५६ | ४८.८३% | २४४ |
| युनिट ७ | गॅस | १८० | ५१.१७% | ९२ | ४८.८३% | ८८ |
| युनिट ८ | कोळसा व तेल | २५० | ४०.००% | १०० | ६०.००% | १५० |
| **एकूण औष्णिक क्षमता** | | **९३०** | | **४४८** | | **४८२** |
| भिरा | | ३०० | ५१.१७% | १५४ | ४८.८३% | १४६ |
| भिवपुरी | | ७५ | ५१.१७% | ३८ | ४८.८३% | ३७ |
| खोपोली | | ७२ | ५१.१७% | ३७ | ४८.८३% | ३५ |
| **एकूण जलविद्युत क्षमता** | | **४४७** | | **२२९** | | **२१८** |
| **एकूण निर्मिती क्षमता** | | **१३७७** | | **६७७** | | **७००** |

उक्तनिर्देशित दीर्घकालीन क्षमता बांधणी करारनामा / व्यवस्था आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या शेवटपर्यंत म्हणजे ३१ मार्च २०२४ पर्यंत वैध आहे. आधीचा अनुभव आणि विजेच्या एकूण किमतीच्या खर्च-लाभ विश्लेषणानुसार आम्ही माननीय आयोगाला आर्थिक वर्ष २०२३-२४ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ या कालावधीसाठी सुधारित दरनिश्चिती करण्याची विनंती करत आहोत. आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी वीज खरेदी करार आहे आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ साठीचा वीज खरेदी करार प्रस्तुत याचिका दाखल करत असताना निश्चित करायचा आहे याचा विचार करता आम्ही उर्वरित नियंत्रण कालावधीसाठी दर प्रस्तावित केले आहेत आणि माननीय आयोगाला त्याचा विचार करण्याची विनंती करत आहोत.

## १.३ प्रस्तुत याचिकेअंतर्गत सादरीकरणे:

द टाटा पॉवर कंपनी मर्यादित - निर्मिती उद्योगाने या याचिकेत खाली दिल्याप्रमाणे विविध वर्षांसाठी सादरीकरण केले आहेः

**१.३.१. प्रकरण क्र. २०२० चे ९४ मध्ये फेरविचार आदेशाचा प्रभाव**

**१.३.२. युनिट-६ मधील सामायिक मालमत्तांचा प्रभाव.**

**१.३.३. बहुवार्षिक वीजदर विनियम २०१५ नुसारः**

I. प्रत्यक्ष कामगिरीवर आधारित आर्थिक वर्ष २०१९-२० साठी अचूक समायोजन.

II. आर्थिक वर्ष २०१९-२० साठी तफावत / (अतिरिक्त)

**१.३.४. बहुवार्षिक वीजदर विनियम २०१९ नुसारः**

A. प्रत्यक्ष कामगिरीवर आधारित आर्थिक वर्ष २०२०-२१ साठी अचूक समायोजन.

B. प्रत्यक्ष कामगिरीवर आधारित आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी अचूक समायोजन.

C. आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी तात्पुरते अचूक समायोजन.

D. आर्थिक वर्ष २०२२-२३ च्या शेवटी तफावत /अतिरिक्त

E. निर्देशांच्या पालनाची स्थिती

I. आर्थिक वर्ष २०२३-२४ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी सुधारित अंदाज

II. आर्थिक वर्ष २०२३-२४ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी निश्चित खर्च आणि ऊर्जा आकार.

आर्थिक वर्ष २०१९-२० ते आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी प्रत्यक्ष कामगिरीसाठी तसेच आर्थिक वर्ष २०२३-२४ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी सुधारित अंदाजांच्या सादरीकरणाचा थोडक्यात सारांश खाली सादर केल्याप्रमाणे आहे.

## १.४ द टाटा पॉवर कंपनी मर्यादित - निर्मिती उद्योगाची कार्यान्वयन कामगिरी:

### १.४.१. निर्मिती युनिट्सची उपलब्धता आणि संयंत्र भार घटक

आर्थिक वर्ष २०१९-२० ते आर्थिक वर्ष २०२४-२५ या कालावधीत निर्मिती युनिट्सची उपलब्धता आणि संयंत्र भार घटक (पीएलएफ) खालील कोष्टकात दर्शवण्यात आले आहेत:

## तक्ता १-३: निर्मिती युनिट्सची उपलब्धता आणि पीएलएफ

%

| युनिट | निकषात्मक | उपलब्धता | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | आर्थिक वर्ष २०१९-२० | आर्थिक वर्ष २०२०-२१ | आर्थिक वर्ष २०२१-२२ | आर्थिक वर्ष २०२२-२३ | आर्थिक वर्ष २०२३-२४ | आर्थिक वर्ष २०२४-२५ |
| | | प्रत्यक्ष | प्रत्यक्ष | प्रत्यक्ष | अंदाजित | सुधारित अंदाज | |
| युनिट ५ | ८५.००% | ९७.९०% | ८७.२३% | ९३.९०% | ८८.४०% | ९४.०८% | ९२.९५% |
| युनिट ७ | | ९२.३८% | ९८.७७% | ९१.७३% | ९७.८२% | ९७.०९% | ९७.०८% |
| युनिट ८ | | ८६.३१% | ९७.७५% | ८८.८०% | ९०.४५% | ९०.८९% | ९६.५८% |
| भिरा | ९०.००% | ९५.४८% | ९९.३८% | ९८.१७% | ९७.९३% | ९०.८७% | ९४.४९% |
| भिवपुरी | | ९७.५५% | ९४.३९% | १००.००% | ९७.९३% | ९९.५९% | ९९.५९% |
| खोपोली | | ९८.३६% | १००.००% | १००.००% | ९८.२८% | ९९.५९% | ९९.५१% |

%

| युनिट | संयंत्र भार घटक | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | आर्थिक वर्ष २०१९-२० | आर्थिक वर्ष २०२०-२१ | आर्थिक वर्ष २०२१-२२ | आर्थिक वर्ष २०२२-२३ | आर्थिक वर्ष २०२३-२४ | आर्थिक वर्ष २०२४-२५ |
| | प्रत्यक्ष | प्रत्यक्ष | प्रत्यक्ष | अंदाजित | सुधारित अंदाज | |
| युनिट ५ | ७१.५०% | ६२.४९% | ६९.८७% | ६१.१५% | ७५.७१% | ७६.६९% |
| युनिट ७ | ७१.९१% | ८७.६२% | ५७.७३% | ४८.७३% | ८०.८९% | ७५.९८% |
| युनिट ८ | ७३.६७% | ३८.७८% | ६८.०५% | ६५.१७% | ७८.३२% | ८७.०३% |

## तक्ता १-४ : निर्मिती युनिट्सची एकूण कार्यान्वयन कामगिरी

**औष्णिक (युनिट ५, ७ आणि ८)**

| तपशील | २०२३-२४ | | २०२४-२५ | |
|---|---|---|---|---|
| | मान्यताप्राप्त | सुधारित अंदाज | मान्यताप्राप्त | सुधारित अंदाज |
| उपलब्धता (%) | ९६.०५% | ९३.८०% | ९३.४७% | ९४.७३% |
| संयंत्र भार घटक (%) | ७७.६३% | ७७.६३% | ७९.३३% | ७९.३३% |
| एकूण निर्मिती (एमयू) | ६३२४ | ६३२४ | ६४६३ | ६४६३ |
| नियोजित / निव्वळ उत्पादन (एमयू) | ५९४३ | ६००० | ६०६७ | ६१२८ |

**जलविद्युत (भिरा, भिवपुरी आणि खोपोली)**

| तपशील | २०१९-२० | | २०२०-२१ | | २०२१-२२ | | २०२२-२३ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मान्यताप्राप्त | प्रत्यक्ष | मान्यताप्राप्त | प्रत्यक्ष | मान्यताप्राप्त | प्रत्यक्ष | मान्यताप्राप्त | अंदाजित |
| उपलब्धता ( %) | ९७.१७% | ९६.२९% | ९८.०६% | ९८.६४% | ९८.५९% | ९८.७७% | ९९.०३% | ९७.९८% |
| एकूण निर्मिती (एमयू) | १५१५ | १५१९ | १४७० | १५२६ | १४७० | १५९६ | १४७० | १६०० |
| नियोजित / निव्वळ उत्पादन (एमयू) | १४९२ | १४९३ | १४५४ | १५०० | १४५४ | १५६८ | १४५४ | १५७३ |

## सुधारित अंदाज:

**औष्णिक (युनिट ५, ७ आणि ८)**

| तपशील | २०२३-२४ | | २०२४-२५ | |
|---|---|---|---|---|
| | मान्यताप्राप्त | सुधारित अंदाज | मान्यताप्राप्त | सुधारित अंदाज |
| उपलब्धता (%) | ९६.०५% | ९३.८०% | ९३.४७% | ९४.७३% |
| संयंत्र भार घटक (%) | ७७.६३% | ७७.६३% | ७९.३३% | ७९.३३% |
| एकूण निर्मिती (एमयू) | ६३२४ | ६३२४ | ६४६३ | ६४६३ |
| नियोजित / निव्वळ उत्पादन (एमयू) | ५९४३ | ६००० | ६०६७ | ६१२८ |

**जलविद्युत (भिरा, भिवपुरी आणि खोपोली)**

| तपशील | २०२३-२४ | | २०२४-२५ | |
|---|---|---|---|---|
| | मान्यताप्राप्त | सुधारित अंदाज | मान्यताप्राप्त | सुधारित अंदाज |
| उपलब्धता (%) | ९५.१९% | ९६.२९% | ९९.३४% | ९८.६४% |
| एकूण निर्मिती (एमयू) | १४७० | १४७० | १४७० | १४८४ |
| नियत/ निव्वळ उत्पादन (एमयू) | १४५४ | १४५४ | १४५४ | १४६८ |

### १.४.२. द टाटा पॉवर कंपनी मर्यादित - निर्मिती उद्योगामधून निर्मिती

द टाटा पॉवर कंपनी मर्यादित - निर्मिती उद्योगाच्या विविध निर्मिती केंद्रांमधून आर्थिक वर्ष २०१९-२० ते आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी प्रत्यक्ष निर्मिती, आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी अंदाजित उत्पादन आणि आर्थिक वर्ष २०२३-२४ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी सुधारित अंदाजित निर्मिती खालील कोष्टकात दिल्याप्रमाणे आहे:

**तक्ता १-५: द टाटा पॉवर निर्मिती केंद्रांमधून एकूण आणि नियत/निव्वळ उत्पादन**

*एमयू*

| युनिट | एकूण निर्मिती | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | आर्थिक वर्ष २०१९-२० | आर्थिक वर्ष २०२०-२१ | आर्थिक वर्ष २०२१-२२ | आर्थिक वर्ष २०२२-२३ | आर्थिक वर्ष २०२३-२४ | आर्थिक वर्ष २०२४-२५ |
| | प्रत्यक्ष | प्रत्यक्ष | प्रत्यक्ष | अंदाजित | सुधारित अंदाज | |
| युनिट ५ | ३१४० | २७३७ | ३०८७ | २६७८ | ३३२५ | ३३५९ |
| युनिट ७ | ११३७ | १३८२ | ९११ | ७७९ | १२७९ | ११९८ |
| युनिट ८ | १६१८ | ८४९ | १५१३ | १४२७ | १७२० | १९०६ |
| **एकूण औष्णिक** | **५८९५** | **४९६८** | **५५१२** | **४८८४** | **६३२४** | **६४६३** |
| जलविद्युत | १५१९ | १५२६ | १५९६ | १६०० | १४७० | १४८४ |
| **एकूण** | **७४१४** | **६४९४** | **७१०७** | **६४८४** | **७७९४** | **७९४७** |

*एमयूs*

| युनिट | नियोजित/ निव्वळ उत्पादन | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | आर्थिक वर्ष २०१९-२० | आर्थिक वर्ष २०२०-२१ | आर्थिक वर्ष २०२१-२२ | आर्थिक वर्ष २०२२-२३ | आर्थिक वर्ष २०२३-२४ | आर्थिक वर्ष २०२४-२५ |
| | प्रत्यक्ष | प्रत्यक्ष | प्रत्यक्ष | अंदाजित | सुधारित अंदाज | |
| **युनिट ५** | २९५९ | २५७५ | २९०९ | २५१० | ३१४९ | ३१८२ |
| **युनिट ७** | ११०२ | १३४० | ८८० | ७४७ | १२४१ | ११६१ |
| **युनिट ८** | १५१५ | ७८८ | १४१२ | १३२८ | १६१० | १७८४ |
| **जलविद्युत** | १४९३ | १५०० | १५६८ | १५७३ | १४५४ | १४६८ |

## १.४.३. उष्मादर आणि सहाय्यभूत वापर

आर्थिक वर्ष २०१९-२०, आर्थिक वर्ष २०२०-२१ आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी प्रत्यक्ष उष्मादर आणि सहाय्यभूत वापर आणि आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी तात्पुरती आकडेवारी खालील कोष्टकात सादर करण्यात आली आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ या कालावधीसाठी बहुवार्षिक दर विनियम २०१९ नुसार निकषात्मक मूल्ये विचारात घेण्यात आली आहेत.

## तक्ता १-६: निर्मिती युनिट्ससाठी उष्मादर

*किलोकॅलरी/केडब्ल्यूएच*

| युनिट | ऊष्मादर | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | आर्थिक वर्ष २०१९-२० | | आर्थिक वर्ष २०२०-२१ | | आर्थिक वर्ष २०२१-२२ | | आर्थिक वर्ष २०२२-२३ | |
| | निकषात्मक | प्रत्यक्ष | निकषात्मक | प्रत्यक्ष | निकषात्मक | प्रत्यक्ष | निकषात्मक | अंदाजित |
| युनिट ५ | २५४९ | २५४६ | २५४९ | २५९५ | २५४९ | २५५८ | २५४९ | २५७९ |
| युनिट ७** | २०३८ | २०३५ | २०३८ | २००४ | २०४२ | २०८३ | २०२७ | २१५३ |
| युनिट ८ | २४५० | २३३८ | २४३० | २३५१ | २४३० | २३४० | २४३० | २३५० |

** कार्यान्वयनाच्या खुले चक्र माध्यमासह युनिट ७ साठी सुधारित उष्मा दर

## तक्ता १-७: निर्मिती युनिट्ससाठी सहाय्यभूत वापर

*%*

| युनिट | सहाय्यभूत वापर | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | आर्थिक वर्ष २०१९-२० | | आर्थिक वर्ष २०२०-२१ | | आर्थिक वर्ष २०२१-२२ | | आर्थिक वर्ष २०२२-२३ | |
| | निकषात्मक | प्रत्यक्ष | निकषात्मक | प्रत्यक्ष | निकषात्मक | प्रत्यक्ष | निकषात्मक | अंदाजित |
| युनिट ५ | ६.००% | ५.७९% | ६.००% | ५.९२% | ६.००% | ५.७८% | ६.००% | ६.२८% |
| युनिट ७** | २.९९% | ३.११% | ३.००% | ३.००% | ३.००% | ३.५०% | २.७५% | ४.०२% |
| युनिट ८ | ८.५०% | ६.३३% | ८.५०% | ७.१७% | ८.५०% | ६.६५% | ८.५०% | ६.९६% |
| जलविद्युत | १.५५% | १.६९% | १.०८% | १.६६% | १.०८% | १.७०% | १.०८% | १.६८% |

** कार्यान्वयनाच्या खुले चक्र माध्यमासह युनिट ७ साठी सुधारित एपीसी

## १.५ द टाटा पॉवर कंपनी मर्यादित - निर्मिती उद्योगाची आर्थिक कामगिरी

### १.५.१. भांडवली खर्च आणि भांडवलीकरण

आर्थिक वर्ष २०१९-२० ते आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी प्रत्यक्ष भांडवलीकरण, आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी अंदाजित भांडवलीकरण आणि आर्थिक वर्ष २०२३-२४ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ या कालावधीसाठी द टाटा पॉवर कंपनी मर्यादित - निर्मिती उद्योगाचे सुधारित अंदाजित भांडवलीकरण खालील कोष्टकात दर्शवल्याप्रमाणे आहे:

**तक्ता १-८: भांडवलीकरण (औष्णिक आणि जल)**

*रूपये कोटी*

| युनिट | भांडवलीकरण | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | आर्थिक वर्ष २०१९-२० | आर्थिक वर्ष २०२०-२१ | आर्थिक वर्ष २०२१-२२ | आर्थिक वर्ष २०२२-२३ | आर्थिक वर्ष २०२३-२४ | आर्थिक वर्ष २०२४-२५ |
| | प्रत्यक्ष | प्रत्यक्ष | प्रत्यक्ष | अंदाजित | सुधारित अंदाज | |
| **युनिट ५ ते ७ आणि जलविद्युत केंद्रे** | | | | | | |
| डीपीआर | ६६.०८ | २७.३१ | ३६.८४ | ४९.३७ | ८५.०१ | ९४.०७ |
| बिगर-डीपीआर | २०.७ | १०.१ | ११.८८ | ४.८२ | ४.१ | ०.५ |
| एकूण | **८६.७८** | **३७.४१** | **४८.७१** | **५४.१९** | **८९.११** | **९४.५७** |
| युनिट ८ | | | | | | |
| डीपीआर | ० | ० | ० | ० | ० | ० |
| बिगर-डीपीआर | २.२१ | ०.६६ | ०.९४ | ० | ० | १०.६९ |
| **एकूण** | **२.२१** | **०.६६** | **०.९४** | **०** | **०** | **१०.६९** |

## १.५.२. वार्षिक निश्चित शुल्क

तुर्भे येथील ५ आणि ७ या युनिट्ससाठी, जलविद्युत निर्मिती केंद्रांसाठी आणि तुर्भे युनिट ८ साठी बहुवार्षिक विनियम २०१५ मध्ये नमूद तत्वांचा वापर करून आर्थिक वर्ष २०१९-२० साठी आणि बहुवार्षिक विनियम २०१९ मध्ये नमूद तत्वांनुसार आर्थिक वर्ष २०२०-२१ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ या कालावधीसाठी वार्षिक स्थिर शुल्क काढण्यात आले आहे. ते खालील कोष्टकात दर्शवल्याप्रमाणे आहे:

# तक्ता १-९: वार्षिक निश्चित शुल्क (औष्णिक आणि जलविद्युत)

*रुपये कोटी*

| तपशील | आर्थिक वर्ष २०१९-२० | आर्थिक वर्ष २०२०-२१ | आर्थिक वर्ष २०२१-२२ | आर्थिक वर्ष २०२२-२३ | आर्थिक वर्ष २०२३-२४ | आर्थिक वर्ष २०२४-२५ |
|---|---|---|---|---|---|---|
| | प्रत्यक्ष | प्रत्यक्ष | प्रत्यक्ष | अंदाजित | सुधारित अंदाज | |
| **युनिट ५, ७ आणि हायड्रो** | | | | | | |
| कार्यसंचालन व देखभाल खर्च | ३७६.२६ | ३९८.३५ | ४१३.१२ | ४४६.५३ | ४७३.०९ | ४९६.०५ |
| इतर आर्थिक शुल्क | १.०९ | ०.३४ | ०.७६ | ० | ० | ० |
| निकषात्मक कर्जावरील व्याज | २७.२९ | १८.८८ | ९.७१ | ३.१४ | ० | २.४६ |
| चालू भांडवलावर व्याज | २३.०४ | १९.६ | २०.२३ | ५२.४९ | ३६.६५ | ३१.७ |
| घसारा आणि संबंधित वजावट | १२१.४१ | १३०.५२ | १२६.२ | १३१.९९ | १२९.४५ | १३२.३७ |
| समभागांवरील परतावा | २११.६ | २९०.६६ | २९१. | २७२.४२ | २७३.१६ | २७८.५९ |
| प्रोत्साहन | ४९.८३ | ३९.३ | ३९.४१ | ० | ० | ० |
| प्राप्तीकर | १०४.३४ | ० | ० | ० | ० | ० |
| सामायिक सेवांवरील वितरण | -१२.०२ | -११.६९ | -११.३५ | -११.०२ | -१०.६९ | -१०.३६ |
| **निव्वळ स्थिर शुल्क** | **९०२.८५** | **८८५.९६** | **८८९.०७** | **८९५.५६** | **९०१.६६** | **९३०.८१** |
| वजा: दरेतर उत्पन्न | १०.३५ | १४.५५ | १२.८७ | १२.८७ | १२.८७ | १२.८७ |
| **निव्वळ निश्चित शुल्क** | **८९२.५** | **८७१.४१** | **८७६.२१** | **८८२.६९** | **८८८.८** | **९१७.९४** |

## तक्ता १-१०: वार्षिक स्थिर शुल्क (युनिट ८)

*रूपये कोटी*

| तपशील | आर्थिक वर्ष २०१९-२० | आर्थिक वर्ष २०२०-२१ | आर्थिक वर्ष २०२१-२२ | आर्थिक वर्ष २०२२-२३ | आर्थिक वर्ष २०२३-२४ | आर्थिक वर्ष २०२४-२५ |
|---|---|---|---|---|---|---|
| | **प्रत्यक्ष** | **प्रत्यक्ष** | **प्रत्यक्ष** | **अंदाजित** | **सुधारित अंदाज** | |
| **युनिट ८** | | | | | | |
| कार्यसंचालन व देखभाल खर्च | ७१.८१ | ६१.७५ | ७४.७२ | ७४.८३ | ७७.५३ | ८०.३३ |
| इतर आर्थिक शुल्क | ० | ०.१३ | ०.०१ | ० | ० | ० |
| निकषात्मक कर्जावरील व्याज | २५.८५ | १९.१४ | १३.८५ | ९.४६ | ५.०४ | ३.०९ |
| चालू भांडवलावर व्याज | ९.५९ | २.९ | ४.८५ | १७.६ | ४.३६ | ४.३९ |
| घसारा आणि संबंधित वजावट | ५९.३४ | ५९.५५ | ५९.४ | ५९.४२ | ५९.४२ | ५९.७७ |
| समभागांवरील परतावा | ५५.५८ | ६५.१८ | ६४.१२ | ६०.८७ | ६०.८७ | ६१.१४ |
| प्रोत्साहन | ० | ० | ० | ० | ० | ० |
| प्राप्तीकर | २०.५४ | ० | ० | ० | ० | ० |
| सामायिक सेवांवरील वितरण | १२.०२ | ११.६९ | ११.६९ | ११.०२ | १०.६९ | १०.३६ |
| **निव्वळ स्थिर शुल्क** | **२५४.७३** | **२२०.३३** | **२२८.६३** | **२३३.१९** | **२१७.९** | **२१९.०८** |
| वजाः दरेतर उत्पन्न | ५.१२ | ०.१२ | ३.४२ | ३.४२ | ३.४२ | ३.४२ |
| **निव्वळ निश्चित शुल्क** | **२४९.६१** | **२२०.२१** | **२२५.२१** | **२२९.७७** | **२१४.४८** | **२१५.६६** |

## १.६ इंधन किमती:

द टाटा पॉवर कंपनी मर्यादित - निर्मिती उद्योगाकडून आयात कोळसा, देशांतर्गत नैसर्गिक वायू (एपीएम यंत्रणेअंतर्गत), तेल (एलएसएचएस) आणि आयात आरएलएनजी (रि-गॅसिफाइड द्रवरूप नैसर्गिक वायू) यांचा वापर ट्रॉम्बे येथील त्यांच्या निर्मिती युनिट्ससाठी केला जातो. कोळशाची आयात इंडोनेशियामधून दीर्घकालीन कंत्राटाअंतर्गत केली जाते. एपीएम वायू आणि आरएलएनजीचा पुरवठा गेलकडून होतो तर तेल (एलएसएचएस) स्थानिक तेल रिफायनरींमधून काढले जाते.

आर्थिक वर्ष २०२३-२४ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ या कालावधीसाठी इंधनांच्या किमतीचे सुधारित अंदाज बहुवार्षिक दर विनियम २०१९ च्या विनियम ५०.६ नुसार, खालील कोष्टकात नमूद केल्याप्रमाणे मागील तीन महिन्यांच्या भारित सरासरी किमतींनुसार काढण्यात आले आहेत:

**तक्ता १-११: आर्थिक वर्ष २०२३-२४ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी इंधन किमतींचा अंदाज**

| कोळसा | रूपये/ एमटी | रूपये/ एमकेसीएल | उष्मांक मूल्य |
|---|---|---|---|
| जुलै २२ | १८४४९ | ४२२४ | ४.३६७ |
| ऑगस्ट २२ | १७२८६ | ३९७३ | ४.३५१ |
| सप्टें- २२ | १७०५३ | ३९६६ | ४.३०० |
| **भारित सरासरी** | **१७५६०** | **४०४७** | **४.३३८** |

| एपीएम | रूपये/ एमटी | रूपये/ एमकेसीएल | उष्मांक मूल्य |
|---|---|---|---|
| जुलै २२ | २९३९८ | २२२९ | १३.१८७ |
| ऑगस्ट २२ | २९६८५ | २२६७ | १३.०९२ |
| सप्टें- २२ | २९६२८ | २२६६ | १३.०७३ |
| **भारित सरासरी** | **२९५८३** | **२२५६** | **१३.११३** |

| आरएलएनजी | रूपये/ एमटी | रूपये/ एमकेसीएल | उष्मांक मूल्य |
|---|---|---|---|
| जुलै २२ | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ऑगस्ट २२ | २०१६१३ | १५४२६ | १३.०७ |
| सप्टें- २२ | ०.०० | ०.०० | ०.०० |
| **भारित सरासरी** | **२०१६१३** | **१५४२६** | **१३.०७०** |

| तेल | रूपये/ एमटी | रूपये/ एमकेसीएल | उष्मांक मूल्य |
|---|---|---|---|
| जुलै २२ | ५५३६६ | ५३६१ | १०.३२८ |
| ऑगस्ट २२ | ५५३३९ | ५३५३ | १०.३३८ |
| सप्टें- २२ | ५५३४१ | ५३५२ | १०.३४० |
| **भारित सरासरी** | **५५३६२** | **५३५९** | **१०.३३०** |

या संदर्भात सादर करण्यात येत आहे की, इंधनाच्या विद्यमान किमती या जगभरातील सध्याच्या भौगोलिक- राजकीय परिस्थितीमुळे खूप जास्त वाढल्या आहेत. आमच्या मते ही परिस्थिती तात्पुरती आहे आणि दीर्घकाळ टिकणारी म्हणजे आर्थिक वर्ष २०२३-२४ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ या नियंत्रण कालावधीतील संपूर्ण २ वर्षांसाठी राहण्याची शक्यता नाही. त्यामुळे दोन वर्षांसाठी विद्यमान किमतींवर आधारित राहून दर निश्चित करणे हे लाभार्थ्यांसाठी लाभदायी ठरणार नाही.

द टाटा पॉवर कंपनी मर्यादित - निर्मिती उद्योगाला कोळशाच्या किमतीमध्ये मोठी घट होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे पुढील भागांमध्ये विविध युनिट्समधील निर्मितीचा/ दरांचा अंदाजित दर विचारात घेण्यात आला आहे. आम्ही माननीय आयोगाला विनंती करतो की त्यांनी विद्यमान किमती या तात्पुरत्या स्वरूपाच्या विचारात घ्याव्यात आणि त्यानुसार पुढील भागांमध्ये अंदाजित केल्याप्रमाणे दर निश्चित करावेत.

## १.७ ऊर्जा शुल्क

आधीच्या प्रकरणात नमूद केलेल्या बाबी विचारात घेता, ऊर्जा शुल्क (रूपये/ किलोवॅट) खालील कोष्टकात औष्णिक निर्मिती युनिट्स ५, ७ आणि ८ यांच्यासाठी इंधननिहाय दर्शवण्यात आले आहे:

**तक्ता १-१२: ऊर्जा शुल्क ट्रॉम्बे केंद्र युनिट ५, ७ आणि युनिट ८**

*रूपये/केडब्ल्यूएच*

| तपशील | आर्थिक वर्ष २०२३-२४ | | आर्थिक वर्ष २०२४-२५ | |
|---|---|---|---|---|
| | एमवायटी ऑर्डरमध्ये मान्यताप्राप्त | दावा केलेले | एमवायटी ऑर्डरमध्ये मान्यताप्राप्त | दावा केलेले |
| युनिट-५ | ४.०६३ | ६.५४८ | ४.१८५ | ५.१२९ |
| युनिट-७ | २.९८१ | ४.७२१ | ३.०७० | ४.७२१ |
| युनिट-८ | ४.०१३ | ६.४२७ | ४.१३३ | ५.०४० |
| भिरा | ०.७६६ | ०.९९२ | ०.७६६ | १.०२६ |
| भिवपुरी | १.९८४ | २.३१३ | २.०१४ | २.३९२ |
| खोपोली | ३.३९४ | ३.९५८ | ३.४४७ | ४.०९५ |

आर्थिक वर्ष २०२३-२४ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ या कालावधीसाठी जलविद्युतसाठी क्षमता आणि ऊर्जा शुल्क खालील तक्त्यात दर्शवल्याप्रमाणे आहे:

**तक्ता १-१३: आर्थिक वर्ष २०२३-२४ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी जलविद्युत केंद्रांसाठी क्षमता आणि ऊर्जा शुल्क**

| तपशील | | युनिट | आर्थिक वर्ष २०२३-२४ | | | | आर्थिक वर्ष २०२४-२५ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | भिरा | भिवपुरी | खोपोली | एकूण | भिरा | भिवपुरी | खोपोली | एकूण |
| हायड्रोसाठी स्थिर खर्च | a | रू. कोटी | १४५.९ | ८८.३ | १३६.६३ | **३७०.८४** | १५०.८९ | ९१.३५ | १४१.३५ | **३८३.५९** |
| एनएपीएएफ | b | % | ९०.००% | ९०.००% | ९०.००% | | ९०.००% | ९०.००% | ९०.००% | |
| प्रस्तावित उपलब्धता | c | % | ९०.९०% | ९९.६०% | ९९.६०% | | ९४.४९% | ९९.५९% | ९९.५१% | |
| **क्षमता शुल्क** | d=०.५*a*c/b | कोटी | **७३.६६** | **४८.८६** | **७५.६** | **१९८.११** | **७९.२१** | **५०.५४** | **७८.१५** | **२०७.८९** |
| डिझाइन ऊर्जा | e | एमयू | ७४४.१२ | १९३ | १७४.६८ | **१११२.०३** | ७४४.१२ | १९३ | १७४.६८ | **१११२.०३** |
| सहाय्यभूत वापर | f | % | १.२०% | १.२०% | १.२०% | | १.२०% | १.२०% | १.२०% | |
| निव्वळ डिझाइन ऊर्जा | g =e*(१-f) | एमयू | ७३५ | १९१ | १७३ | **१०९८.६९** | ७३५ | १९१ | १७३ | **१०९८.६९** |
| **ऊर्जा शुल्क दर** | h = ०.५*a/g | रू. किलोवॅट | ०.९९२ | २.३१३ | ३.९५८ | | १.०२६ | २.३९२ | ४.०९५ | |

## १.८ प्रोत्साहने, अनियंत्रित खर्च आणि नफा आणि तोट्याचे वितरण:

द टाटा पॉवर कंपनी मर्यादित - निर्मिती उद्योगाला माननीय आयोगाने निश्चित केलेल्या निकषांपेक्षा जास्त चांगली कार्यान्वयन कामगिरी केल्यास प्रोत्साहने मिळवण्याचा हक्क आहे. त्याचप्रमाणे कोणत्याही प्रकारचे मान्यताप्राप्त नियंत्रणाबाहेरील खर्च ग्राहकांकडे वितरित करणे आवश्यक आहे आणि नियंत्रणयोग्य घटकांमध्ये कोणताही मान्यताप्राप्त लाभ किंवा तोटा विनियमांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रमाणात ग्राहकांसोबत वितरित केला गेला पाहिजे. त्यानुसार द टाटा पॉवर कंपनी मर्यादित - निर्मिती उद्योगाने आर्थिक वर्ष २०१९-२०, आर्थिक वर्ष २०२०-२१ आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ या कालावधीसाठी लागू लाभांचे गणन केले आहे, नियंत्रणाबाहेरील खर्च विचारात घेतले आहेत आणि नफा/ (तोटा) यांचे गणन केले आहे.

आर्थिक वर्ष २०१९-२० साठी बहुवार्षिक विनियमांअंतर्गत निश्चित उक्तनिर्देशित तत्वांचा विचार करून तर आर्थिक वर्ष २०२०-२१ आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी एमवायटी विनियम २०१९ अंतर्गत निश्चित तत्वांचा विचार करून अचूक समायोजन करण्यात आले आहे. आर्थिक वर्ष २०१९-२० ते आर्थिक वर्ष २०२१-२२ या कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) खालील कोष्टकात सादर केल्याप्रमाणे आहेः

## तक्ता १-१४: आर्थिक वर्ष २०१९-२० ते आर्थिक वर्ष २०२१-२२ या कालावधीसाठी युनिट ५, ७ आणि जलविद्युत यांच्या नफा / (तोटा) यांचे वितरण

*रूपये कोटी*

| तपशील | आर्थिक वर्ष २०१९-२० | | आर्थिक वर्ष २०२०-२१ | | आर्थिक वर्ष २०२१-२२ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभ/ (नुकसान) | लाभार्थ्यांना वितरित केलेले | लाभ/ (नुकसान) | लाभार्थ्यांना वितरित केलेले | लाभ/ (नुकसान) | लाभार्थ्यांना वितरित केलेले |
| ऊष्मादर | १.८६ | १.२४ | -१०.६८ | -३.५६ | -१०.०७ | -६.७१ |
| कार्यसंचालन व देखभाल खर्च | ११.६६ | ७.७७ | ४१.४३ | २७.६२ | २१.५३ | १४.३५ |
| सहाय्यभूत वापर | -१.७१ | -१.१४ | -०.०१ | ० | १.९१ | १.२७ |
| आयओडब्ल्यूसी | -४.६ | -३.०७ | २६.०३ | १७.३५ | २५.४९ | १६.९९ |
| **एकूण** | **७.२** | **४.८** | **५६.७७** | **४१.४१** | **३८.८६** | **२५.९१** |

## तक्ता १-१५: आर्थिक वर्ष २०१९-२० ते आर्थिक वर्ष २०२१-२२ या कालावधीसाठी युनिट ८ च्या नफा / (तोटा) यांचे वितरण

*रूपये कोटी*

| तपशील | आर्थिक वर्ष २०१९-२० | | आर्थिक वर्ष २०२०-२१ | | आर्थिक वर्ष २०२१-२२ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभ/ (नुकसान) | लाभार्थ्यांना वितरित केलेले | लाभ/ (नुकसान) | लाभार्थ्यांना वितरित केलेले | लाभ/ (नुकसान) | लाभार्थ्यांना वितरित केलेले |
| ऊष्मादर | २५.६३ | १७.०९ | १०.७१ | ७.१४ | ३०.७६ | २०.५१ |
| कार्यसंचालन व देखभाल खर्च | -८.८ | -२.९३ | ११.९७ | ७.९८ | -७.४९ | -२.५ |
| सहाय्यभूत वापर | १२.६७ | ८.४४ | ३.९ | २.६ | १५.३९ | १०.२६ |
| आयओडब्ल्यूसी | १.९२ | १.२८ | ८.६९ | ५.७९ | ९.१८ | ३.०६ |
| **एकूण** | **३१.४१** | **२३.८७** | **३५.२७** | **२३.५१** | **४७.८४** | **३१.३३** |

उक्तनिर्देशित तक्त्यातून दिसून येते की ग्राहकांना निर्मिती युनिट्सच्या कार्यक्षम कार्यान्वयनामुळे लाभ होऊ शकतो.

## १.९ आर्थिक वर्ष २०१९-२० ते आर्थिक वर्ष २०२२-२३ या कालावधीसाठी निव्वळ तफावत / (अतिरिक्त)

आर्थिक वर्ष २०१९-२० ते आर्थिक वर्ष २०२१-२२ या कालावधीसाठी अचूक समायोजन केल्यानंतर आलेल्या एकूण महसुली आवश्यकता नुसार संपूर्ण वर्षात मिळालेला महसूल, आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी तात्पुरते अचूक समायोजन, वितरण कंपन्यांकडून वसूल केलेली रक्कम आणि पुढे नेण्याचा खर्च, निव्वळ तफावत / (अतिरिक्त) जी वितरण परवानाधारकांकडून वसूल करायची आहे / वितरित करायची आहे ती खालील कोष्टकात नमूद केलेली आहे:

## तक्ता १-१६: आर्थिक वर्ष २०१९-२० ते आर्थिक वर्ष २०२२-२३ या कालावधीसाठी युनिट ५, ७ आणि जलविद्युत यांच्या तफावत / (अतिरिक्त)

*रुपये कोटी*

| अनु क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०१९-२० | | आर्थिक वर्ष २०२०-२१ | | आर्थिक वर्ष २०२१-२२ | | आर्थिक वर्ष २०२२-२३ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मान्यताप्राप्त | दावा | मान्यताप्राप्त | दावा | मान्यताप्राप्त | दावा | मान्यताप्राप्त | प्रस्तावित |
| **अ** | **खर्च** | | | | | | | | |
| १ | इंधनाशी संबंधित खर्च | १३९९.०२ | १३५३.९५ | १४४३.९६ | ११०४.७७ | १५६७ | १८०२.३९ | १५२५ | २७०८.४२ |
| २ | कार्यान्वयन आणि देखभाल खर्च | ४३७.१९ | ३८०.३३ | ४२१.१७ | ४०४.७७ | ४३४.१४ | ४१६.२५ | ४४७.५१ | ४५०.६ |
| ३ | घसारा | १२८.७१ | १२१.४१ | १३१.०७ | १३०.५२ | १३२.५८ | १२६.२ | १३३.५९ | १३१.९९ |
| ४ | कर्ज भांडवलावरील व्याज वित्तपुरवठा आणि पुनर्वित्त शुल्कासह | २७.७६ | २६.६४ | २०.७९ | १८.८८ | १२.१२ | ९.७१ | ३.७७ | ३.१४ |
| ५ | चालू भांडवलावरील व्याज (आयओडब्ल्यूसी) | ३१.६५ | २३.०४ | ३१.४३ | ८.६८ | ३१.६९ | १४.३७ | ३१.९५ | ५२.४९ |
| ६ | इतर खर्च | ० | १.०९ | ० | ०.३४ | ० | ०.७६ | ० | ० |
| ७ | प्राप्तीकर | १२६.४९ | १०४.३४ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **ब** | **एकूण महसुली खर्च** | २१५०.८२ | २०१०.८ | २०४८.४२ | १६६७.९६ | २१७७.९ | २३६९.६९ | २१४५.२४ | ३३४६.६४ |
| ८ | अधिकः समभागांवर परतावा | २१०.८६ | २११.६ | २५८.४६ | २९०.६६ | २६०.९८ | २९१. | २६२.६७ | २७२.४२ |
| **क** | **एकूण महसुली आवश्यकता** | २३६१.६८ | २२२२.४ | २३०६.८८ | १९५८.६२ | २४३८.८८ | २६६०.६८ | २४०७.९१ | ३६१९.०६ |
| ९ | अधिकः प्रोत्साहन (पीएलएफ आणि जल प्रोत्साहन) | ० | ४९.८३ | ० | ३९.३ | ० | ३९.४१ | ० | ० |
| १० | इंधन खर्च, कार्यसंचालन व देखभाल खर्च आणि आयओडब्ल्यूसी तसेच सहाय्यभूत वापर लाभासह यांच्यामुळे लाभ/ (नुकसान) यांचे वितरण केल्यानंतर निव्वळ हक्क | २३६१.६८ | २२७२.२४ | २३०६.८८ | १९९७.९२ | २४३८.८८ | २७००.०९ | २४०७.९१ | ३६१९.०६ |
| ११ | कर्जाच्या पुनर्वित्तपुरवठ्यामुळे लाभ/ (नुकसान) यांचे वितरण केल्यानंतर निव्वळ हक्क | | २२७२.८९ | | | | | | |
| १२ | वजाः युनिट ८ संयुक्त क्षमतेचा वितरित खर्च | १२.०२ | १२.०२ | ११.६९ | ११.६९ | ११.३५ | ११.३५ | ११.०२ | ११.०२ |
| १३ | वजाः दरेतर उत्पन्न | ३०.८६ | १०.३५ | ३०.८६ | १४.५५ | ३०.८६ | १२.८७ | ३०.८६ | १२.८७ |
| ड | **निव्वळ एकूण महसुली आवश्यकता** | २३१८.८ | २२५०.५२ | २२६४.३३ | १९७१.६८ | २३९६.६७ | २६७५.८७ | २३६६.०३ | ३५९५.१७ |
| ई | **महसूल** | | २२९१.३८ | | १९६३.१२ | | २६६८.४४ | | ३६२९.०१ |
| फ | **महसूल तफावत/ (अतिरिक्त) (ड-ई)** | | -४०.८७ | | ८.५७ | | ७.४४ | | -३३.८३ |

## तक्ता १-१७: आर्थिक वर्ष २०१९-२० ते आर्थिक वर्ष २०२२-२३ या कालावधीसाठी युनिट ८ साठी तफावत / (अतिरिक्त)

*रुपये कोटी*

| अनु क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०१९-२० | | आर्थिक वर्ष २०२०-२१ | | आर्थिक वर्ष २०२१-२२ | | आर्थिक वर्ष २०२२-२३ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मान्यताप्राप्त | दावा | मान्यताप्राप्त | दावा | मान्यताप्राप्त | दावा | मान्यताप्राप्त | प्रस्तावित |
| **अ** | **खर्च** | | | | | | | | |
| १ | इंधनाशी संबंधित खर्च | ५५० | ५२०.२३ | ३९६ | २५९.८ | ६१४ | ७४३.१३ | ६५६ | १२२८.९२ |
| २ | कार्यान्वयन आणि देखभाल खर्च | ६८.८८ | ७१.८१ | ६९.७३ | ६१.७५ | ७२.२३ | ७४.७२ | ७४.८३ | ७४.८३ |
| ३ | घसारा | ६१.५५ | ५९.३४ | ६१.६५ | ५९.५५ | ६२.१८ | ५९.४ | ६२.६१ | ५९.४२ |
| ४ | कर्ज भांडवलावरील व्याज वित्तपुरवठा आणि पुनर्वित्त शुल्कासह | २६.४ | २५.८५ | २१.२ | १९.१४ | १६.४७ | १३.८५ | ११.५९ | ९.४६ |
| ५ | चालू भांडवलावरील व्याज (आयओडब्ल्यूसी) | ११.३३ | ९.५९ | ९.७९ | २.९ | ९.८२ | ४.८५ | ९.८६ | १७.६ |
| ६ | इतर खर्च | ० | ० | ० | ० | ० | ०.७६ | ० | ० |
| ७ | प्राप्तीकर | १७.८८ | २०.५४ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **ब** | **एकूण महसुली खर्च** | **७३६.०१** | **७०७.३६** | **५५८.८२** | **४०३.१३** | **७७४.७४** | **८९६.७१** | **८१४.४६** | **१३९०.२२** |
| ८ | अधिकः समभागांवर परतावा | ५५.५८ | ५५.५८ | ६०.९३ | ६५.१८ | ६१.४६ | ६४.१२ | ६१.८९ | ६०.८७ |
| **क** | **एकूण महसुली आवश्यकता** | **७९१.६** | **७६२.९४** | **६१९.७६** | **४६८.३१** | **८३६.२** | **९६०.८३** | **८७६.३४** | **१४५१.०९** |
| ९ | अधिकः प्रोत्साहन (पीएलएफ आणि जल प्रोत्साहन) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १० | इंधन खर्च, कार्यसंचालन व देखभाल खर्च आणि आयओडब्ल्यूसी तसेच सहाय्यभूत वापर लाभासह यांच्यामुळे लाभ/ (नुकसान) यांचे वितरण केल्यानंतर निव्वळ हक्क | ७९१.६ | ७६२.९४ | ६१९.७६ | ४६८.३१ | ८३६.२ | ९६०.८३ | ८७६.३४ | १४५१.०९ |
| ११ | कर्जाच्या पुनर्वित्तपुरवठ्यामुळे लाभ/ (नुकसान) यांचे वितरण केल्यानंतर निव्वळ हक्क | | | | | | | | |
| १२ | अधिकः संयुक्त क्षमतेचा वितरित खर्च | १२.०२ | १२.०२ | ११.६९ | ११.६९ | ११.३५ | ११.३५ | ११.०२ | ११.०२ |
| १३ | वजाः दरेतर उत्पन्न | ०.०९ | ५.१२ | ०.०९ | ०.१२ | ०.०९ | ३.४२ | ०.०९ | ३.४२ |
| **ड** | **निव्वळ एकूण महसुली आवश्यकता** | **८०३.५३** | **७६९.८४** | **६३१.३५** | **४७९.८७** | **८४७.४७** | **९६८.७६** | **८८७.२८** | **१४५८.६९** |
| **ई** | **महसूल** | | **७९१.६९** | | **५०३.१३** | | **१००५.१२** | | **१४८९.९२** |
| **फ** | **महसूल तफावत/ (अतिरिक्त) (ड-ई)** | | **-२१.८५** | | **-२३.२५** | | **-३६.३५** | | **-३१.२३** |

## १.१० मागील वसुली

### तक्ता १-१८: आर्थिक वर्ष २०१७-१८ आणि आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी मागील वसुलीचा सारांश

*(रुपये कोटी)*

| तपशील | युनिट ५, ७ आणि जलविद्युत | युनिट ८ |
|---|---|---|
| **आर्थिक वर्ष २०१७-१८** | | |
| आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी आयओडब्ल्यूसी | ०.०४ | ० |
| सहाय्यभूत वापरावर नफा / तोटा यांचे वाटप | -२.४१ | -१.३८ |
| आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी जलविद्युत लाभ | ३.९७ | ० |
| **पुढे नेण्याच्या खर्चाखेरीज एकूण प्रभाव** | **१.६** | **-१.३८** |
| **आर्थिक वर्ष २०१८-१९** | | |
| आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी जलविद्युत लाभ | ४.५२ | ० |
| सुधारित प्राप्तीकर | -१३.२४ | ० |
| **पुढे नेण्याच्या खर्चाखेरीज एकूण प्रभाव** | **-८.७२** | **०** |

## तक्ता १-१९: आर्थिक वर्ष २०१७-१८ ते आर्थिक वर्ष २०१९-२० साठी तफावत/ (अतिरिक्त) यांचा सारांश

*(रूपये कोटी)*

| तपशील | | आर्थिक वर्ष २०१७-१८ | आर्थिक वर्ष २०१८-१९ | आर्थिक वर्ष २०१९-२० | आर्थिक वर्ष २०२०-२१ | आर्थिक वर्ष २०२१-२२ | आर्थिक वर्ष २०२२-२३ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **युनिट ५ ते ७ आणि जलविद्युत केंद्रे** | | | | | | | |
| **पुढे नेण्याचा खर्च दर** | A | १०.१८% | ९.८९% | ९.६६% | ८.५७% | ८.५०% | ९.४५% |
| प्रारंभीची शिल्लक | B | | १.६ | -७.१२ | -४१.४८ | -३२.९१ | -२५.४७ |
| वर्षादरम्यान भर | C | | | -४०.८७ | ८.५७ | ७.४४ | -३३.८३ |
| **युनिट ६ सामायिक मालमत्ता** | D | | | ६.५१ | | | |
| **पुनरावलोकन याचिका ९४ / २०२०** | E | १.६ | -८.७२ | | | | |
| अंतिम शिल्लक | F=B+C+D+E | १.६ | -७.१२ | -४१.४८ | -३२.९१ | -२५.४७ | -५९.३१ |
| सरासरी शिल्लक | G= Average (B,F) | ०.८ | | -२४.३ | -३७.१९ | -२९.१९ | -४२.३९ |
| राखण्याचा खर्च | H=A*G | | | -२.३५ | -३.१९ | -२.४८ | -४.०१ |
| **एकूण पुढे नेण्याचा खर्च** | I | | | | | | **-१२.०२** |
| **युनिट ८** | | | | | | | |
| प्रारंभीची शिल्लक | J | | -१.३८ | -१.३८ | -२३.२३ | -४६.४८ | -८२.८४ |
| वर्षादरम्यान भर | K | | | -२१.८५ | -२३.२५ | -३६.३५ | -३१.२३ |
| **पुनरावलोकन याचिका ९४ / २०२०** | L | **-१.३८** | **०** | | | | |
| अंतिम शिल्लक | M=J+K+L | -१.३८ | -१.३८ | -२३.२३ | -४६.४८ | -८२.८४ | -११४.०६ |
| सरासरी शिल्लक | N=Average (J,M) | | | -१२.३ | -३४.८६ | -६४.६६ | -९८.४५ |
| राखण्याचा खर्च | O=A*N | | | -१.१९ | -२.९९ | -५.५ | -९.३ |
| **एकूण पुढे नेण्याचा खर्च** | P | | | | | | **-१८.९८** |

*(रूपये कोटी)*

| **लाभार्थ्यांमध्ये वितरण** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **युनिट ५, ७ आणि जलविद्युत** | | **युनिट ८** | | **एकूण** |
| **लाभार्थी** | % | **रू. कोटी** | % | **रू. कोटी** | **रू. कोटी** |
| **बेस्ट** | **५१.१७%** | -३६.५ | **४०.००%** | -५३.२२ | -८९.७२ |
| **टाटा पॉवर-डी** | **४८.८३%** | -३४.८३ | **६०.००%** | -७९.८२ | -११४.६५ |
| **एकूण पुढे नेण्याचा खर्च** | **१००.००%** | **-७१.३३** | **१००.००%** | **-१३३.०४** | **-२०४.३७** |

उक्तनिर्देशित, तक्त्यातून दिसून येते की आर्थिक वर्ष २०१९-२०, आर्थिक वर्ष २०२०-२१ आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी एकत्रितरित्या निव्वळ एकूण अतिरिक्त रक्कम आहे आणि ती वितरण परवानाधारकांसोबत वितरित करणे आवश्यक आहे. ही रक्कम आदेशापासून एका महिन्यात तात्काळ वितरण परवानाधारकांसोबत वितरित करणे प्रस्तावित आहे. माननीय आयोगाला प्रस्तुत रक्कम हप्त्यांमध्ये वितरित करणे योग्य वाटल्यास आम्ही माननीय आयोगाला विनंती करतो की त्यांनी आधीच्या दरपत्रक आदेशांमध्ये लागू करण्यात आल्याप्रमाणे योग्य ते व्याज लागू करावे.

## १.११ आर्थिक वर्ष २०२३-२४ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ या कालावधीसाठी एकूण निर्मिती सुधारित दर निश्चिती

द टाटा पॉवर कंपनी मर्यादित - निर्मिती उद्योगाने तुर्भे आणि विविध जलविद्युत केंद्रांवरील निर्मिती क्षमता विनियमित केली आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ या कालावधीसाठी युनिटनिहाय स्थिर खर्च खाली दर्शवल्याप्रमाणे आहे:

**तक्ता १-२०: आर्थिक वर्ष २०२३-२४ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी युनिट ५, ७, ८ आणि जलविद्युतसाठी वार्षिक स्थिर शुल्क**

*(रूपये कोटी)*

| युनिट | निश्चित शुल्क | | | |
|---|---|---|---|---|
| | आर्थिक वर्ष २०२३-२४ | | आर्थिक वर्ष २०२४-२५ | |
| | मान्यताप्राप्त | दावा | मान्यताप्राप्त | दावा |
| **औष्णिक** | | | | |
| युनिट ५ | ३९४.९८ | ३२४.६२ | ४०३.२३ | ३३५.६७ |
| युनिट ७ | १४८.४२ | १९३.३४ | १५०.५६ | १९८.६८ |
| युनिट ८ | २२८.७१ | २१४.४८ | २२६.७७ | २१५.६६ |
| **जलविद्युत** | | | | |
| भिरा | ११२.८७ | १४५.९ | ११४.३२ | १५०.८९ |
| भिवपुरी | ७५.७७ | ८८.३ | ७६.८८ | ९१.३५ |
| खोपोली | ११७.१५ | १३६.६३ | ११८.९८ | १४१.३५ |
| **एकूण** | **१०७७.९** | **११०३.२८** | **१०९०.७४** | **११३३.६१** |

## तक्ता १-२१: युनिट ८ सह औष्णिक युनिट्स आणि जलविद्युतसाठी सुधारित अंदाजित एआरआर

*(रुपये कोटी))*

| अनु क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०२३-२४ | आर्थिक वर्ष २०२४-२५ |
|---|---|---|---|
| **अ** | **परिवर्तनीय खर्च** | **४८५६.८९** | **३८६७.९२** |
| **ब** | **क्षमता शुल्क** | | |
| १ | कार्यसंचालन व देखभाल खर्च | ५४६.५५ | ५७२.३ |
| २ | जल शुल्क | ४.०७ | ४.०७ |
| ३ | दीर्घकालीन कर्जावरील व्याज आणि इतर आर्थिक शुल्क | ५.०४ | ५.५५ |
| ४ | खेळत्या भाडवंलावरील व्याज | ४१.०१ | ३६.०९ |
| ५ | घसारा | १८८.८७ | १९२.१४ |
| ६ | समभागावर परतावा | ३३४.०२ | ३३९.७३ |
| ७ | आयकर | | |
| ८ | कमी एनटीआय | १६.२९ | १६.२९ |
| **ब** | **एकूण क्षमता शुल्क** | **११०३.२८** | **११३३.६१** |
| **क** | **एकूण महसूल आवश्यकता** | **५९६०.१७** | **५००१.५३** |

आम्ही माननीय आयोगाला प्रस्तुत याचिकेअंतर्गत करण्यात आलेली सादरीकरणे स्वीकारण्याची विनंती करतो.